वाहतूक नियंत्रण शाखा

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
वरिष्ठ पोलीस निरीक्षक (नियोजन),
पोलीस सह आयुक्त, वाहतूक यांचे
कार्यालय,वाहतूक पोलीस मुख्यालय,
८७, सर पोचखानवाला रोड, वरळी,
मुंबई ४०० ०३०.

TEL:- 022- 24945339
E-Mail:
piplanning.traffic@mahapolice.gov.in

जा.क्र..१२७५..../वपोनि/नियो-१५६६/वा/डी.बी.मार्ग,मरिन ड्राईव्ह/Orange Gate /२०२६, दि. १०/०८/२०२६

प्रति,

**Shri. S R Bhadane**
Executive Engineer
MMRDA, BKC,
Bandra East, Mumbai- 400 051

| | | |
|---|---|---|
| विषय | : | **डी.बी.मार्ग,मरिन ड्राईव्ह वा.वि.हद्दीतील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह रोड पर्यत टनेल रोड प्रकल्पाचे कामासाठी आणि वाहतूक वळविण्याकरीता** वाहतुक शाखेची ना-हरकत मिळणेबाबत. |
| संदर्भ | : | Larsen & Toubro Letter - EWCR-L&T-TBM-OG-000-00407 ,Dt. 04-06-2026 |

उपरोक्त संदर्भाधिन विषयाच्या अनुषंगाने डी.बी.मार्ग,मरिन ड्राईव्ह वा.वि. हद्दीतील **ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह रोड पर्यत टनेल रोड प्रकल्पाचे कामासाठी आणि वाहतूक वळविण्याकरीता** ना-हरकत मिळणेबाबत विनंती केलेली आहे. नमुद प्रकल्पाचे काम हे एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणा मार्फत मे.एल ॲण्ड टी या कंपनीकडून करण्यात येणार आहे.

यास्तव, प्रस्तुत ठिकाणी वाहतूकीच्या दृष्टिकोनातून पडताळणी करण्यात आली असून,दि. ०६/०८/२०२६ **रोजी झालेल्या बैठकी मध्ये आपणास देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे**, या अटीसह आपणांस वाहतूक शाखेकडून खालील अटी व शर्तीस अनुसरुन तसेच इंडियन रोड कॉग्रेस एस.पी.५५-२०१४ मधील नियमांची कठोरपणे पालन करतील या अटींवर **ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह रोड पर्यत टनेल रोड प्रकल्पाचे उपरोक्त संदर्भान्वये दिलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे ०५ टप्प्या मध्ये खोदकाम करण्यासाठी आणि वाहतूक वळविण्याकरीता दि. १०/०८/२०२६ ते दिनांक ३१/१२/२०२८ रोजी पर्यंत (दिवस-रात्रौ)** ना-हरकत देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. | **सदर खोदकामामुळे परिसरात वायू प्रदुषण/हवेची गुणवत्ता खराब होणार नाही याची संबंधीत कंत्राटदार यांनी खबरदारी घेवून त्याप्रमाणे उपाययोजना कराव्यात.** |
| २. | सर्व संबंधित विभागांकडून /स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आवश्यक परवानग्या घेणे. |
| ३. | सदरचे काम हे प्रपोनि/वपोनि, **डी.बी.मार्ग आणि मरीन ड्राईव्ह** वाहतूक विभाग यांचेशी समन्वय साधून टप्प्या-टप्प्याने करण्यात यावे. |
| ४. | **सदर कामासाठी वाहतूक दिशामध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास संबंधीत वपोनि/प्रपोनि यांनी वाहतूक वळविण्याबाबतची अधिसुचना जारी करून प्रसिध्द् करण्याची कार्यवाही करावी.** |
| ५. | **वाहतूकीच्या सुरक्षिततेसाठी कामाच्या ठिकाणी बॅरीकेडींग करावे. बॅरीकेड्स लावण्यात येऊन त्यावर ब्लिंकर्स बसविण्यात यावे.** |
| ६. | कामा दरम्यान वाहतुक नियमनासाठी **डी.बी.मार्ग आणि मरीन ड्राईव्ह** वाहतुक विभागास **प्रत्येक ५० ट्राफिक वार्डन असे एकुण १०० वॉर्डन पुरविण्यात यावेत. तसेच २०० बॅरीकेडस्,२०० रिफ्लेक्टर जॅकेट, २०० बॅटन, २० फ्लॅशर लाईट, ४० दिशादर्शक फलक, प्रत्येक वाहतूक विभागास ०१ चारचाकी व दुचाकी क्रेन चालकासह** पुरविण्यात यावे. |
| ७. | **आपात्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास बंद पडलेली वाहने तात्काळ दुर करण्यास मदत व्हावी या हेतूने एक हेवी लोड क्रेन २४ तास उपलब्ध करुन दयावी.** |
| ८. | संबंधित वाहतूक विभागांनी नेमण्यात आलेल्या वार्डन मार्फतीने वाहतूक नियमनाचे काम करुन घ्यावे. |
| ९. | कामाचे दरम्यान निघालेली माती/इतर साहित्य रस्त्यावर इतरत्र न ठेवता त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी. |

| | |
|---|---|
| १०. | सदरचे काम सर्व सुरक्षिततेच्या उपाययोजना करुनच करण्यात यावे. कामामुळे दुर्घटना अथवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी आपली असेल. |
| ११. | पादचारी व वाहतूक यांना अडथळा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. |
| १२. | कामादरम्यान वाहतूकीच्या रस्त्याचा कमीत कमी वापर करण्यात यावा. तसेच योग्य प्रकारे बॅरीकेडींग करण्यात यावी. पाउस आल्यास खोदकामाचा भाग भक्कम बॅरीकेडींग करुन झाकुन घ्यावा. |
| १३. | कंत्राटदार कंपनी यांनी ना-हरकत/परवानगी मध्ये नमूद वेळेतच खोदकाम करावे. |
| १४. | रात्रौच्या वेळी काम करतांना आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी. कामाचे ठिकाणी ब्लिंकर्स, साईन बोर्ड, रिफ्लेक्टीव्ह स्ट्रीप वाहतूक पोलीसांच्या सुचनेप्रमाणे लावण्यात याव्यात. |
| १५. | खोदकाम करताना इतर आस्थापनांच्या साहित्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. इलेक्ट्रीक लाईन, गॅसलाईन, पाण्याची लाईन इत्यादीचे कामा दरम्यान नुकसान झाल्यास ते पुर्ववत बसविण्याची जबाबदारी आपली राहील. |
| १६. | सदर कामाकरीता वापरण्यात येणारी अवजड वाहने रस्त्यावर कोठेही पार्क होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. |
| १७. | कामाचा कालावधी/कामाचे स्वरुप दर्शविणार फलक खालीलप्रमाणे लावण्यात यावा.<br>• कामाचे नाव -<br>• काम ज्या टप्प्यात चालू आहे त्या टप्प्यातील सुरुवातीचे व शेवटचे उल्लेख -<br>• ठेकेदाराचे नाव -<br>• काम सुरू केल्याचा दिनांक -<br>• काम संपण्याचा दिनांक -<br>• ठेकेदाराचा/कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक -<br>• कार्यकारी अभियंता/उप अभियंता/पर्यवेक्षक अभि.-महानगरपालिका यांचे दुरध्वनी क्र<br>• वाहतूक नियंत्रण शाखेने दिलेल्या ना-हरकत (NOC)प्रमाणपत्राची मुदत-<br>• MCGM, TCBयांचा लोगो- |
| १८. | सदर कामाचे अनुषंगाने ध्वनी प्रदुषण नियंत्रण कायदा व नियम आणि या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालय यांनी जारी केलेल्या विहीत डेसीबल पेक्षा आवाजाची तिव्रता जास्त असणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| १९. | सदर कामामुळे शैक्षणिक संस्था, हॉस्पीटल यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच अग्नीशमन दलाची वाहने, ॲम्ब्युलन्स, बेस्ट बसेस यांना अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| २०. | नमूद ठिकाणी मशिनरीचा आवाज मर्यादित ठेवून वापर करावा. स्थानिक रहिवाशी यांना आवाजाचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| २१. | सार्वजनिक हिताचे दृष्टीने तसेच कामाचे संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यास दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहेत. |
| २२. | या कार्यालयाकडून दिलेल्या उपरोक्त अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल. तसेच संबधित कंत्राटदार यांचेवर **भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २२३** नूसार कारवाई होईल याची नोंद घ्यावी. |
| २३. | वर नमुद अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल याची अर्जदार/कंत्राटदार यांनी नोंद घ्यावी. |

सहायक पोलीस आयुक्त, नियोजन विभाग, वाहतुक, वरळी, मुंबई

मा.पोलीस सह आयुक्त,
वाहतूक, मुंबई यांचे मान्यतेने,

१०/०८

( राजेंद्र मच्छिंदर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक (नियोजन),
वाहतूक, मुंबई

प्रत माहीतीकरीता सविनय सादर :
मा.अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई.
मा.पोलीस उप आयुक्त, **दक्षिण** वाहतूक, मुंबई.
मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, **दक्षिण परिक्षेत्र**, वाहतुक, मुंबई.

प्रत कार्यवाहीकरीता :- वपोनि/प्रपोनि **डी.बी.मार्ग, मरिन ड्राईव्ह** वाहतूक विभाग, मुंबई.

- ❖ वर नमुद अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल याची संबंधीत विभागाचे वपोनि/प्रपोनि दक्षता घेतील.
- ❖ सदर बाबतचा पूर्तता अहवाल ०७ दिवसांत या कार्यालयास सादर करावा.